महाराष्ट्र शासन

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगावं जि.जळगांव

यांचे कार्यालय कृषि उत्पन्न बाजार समिती, धरणगांव आवार दुरध्वनी क्रमांक वेब-मेल :- ar.dharangaon@coop.maharashtra.gov

******************************************************************************

३२० जा.क्र.आस्थापना/कलम ७८/सोनवद बु विका/सन.२०१७ दिनांक. १२/०५/२०१७

वाचले :-१) सचिव, सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. सोनवद खु ता.धरणगांव यांचा दि.०३/०१/२०१७ चा अहवाल

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१)

३) या कार्यालयाची नोटीस जा.क्र.आस्थापना/ सोनवद खु वि.का/क.७८/सन.२०१७ दि.१०/०१/२०१७ ची कारणे दाखवा नोटीस

---

ज्या अर्थी, सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.सोनवद खु ता.धरणगांव जि.जळगांव हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोदणीकृत सहकारी संस्था असून सदर संस्था या कार्यालयाच्या नियंत्रण कक्षेत येते आणि,

ज्या अर्थी सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. सोनवद खु ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेचे एकुण १३ संचालक निवडून आलेले होते.एक जागा रिक्त आहे. १२ संचालकापैकी ११ संचालक दि.३१/०३/२०१७ रोजी थकबाकीदार झाल्याचा अहवाल संस्थेचे सचिव यांनी वाचले क्र.१ नुसार या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार प्राथमिक कृषि पतसंस्थेच्या बाबतीत पिक कर्जाची नियत दिनांकास परतफेड करण्यात कसुर करणारा सदस्य कोणत्याही सहकारी संस्थेचा सदस्य म्हणुन नेमणुक होण्यास,निवडून येण्यास,स्विकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणुन रहाण्यास पात्र असणार नाही.अशी तरतुद आहे.

ज्या अर्थी सबंधीतांस प्रस्तुत प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्या साठी वाचले क्र.३ अन्वये सुनावणी दिनांक. ३१/०१/२०१७ रोजी सचिव हजर संचालक गैर हजर दि. २८/२/२०१७ रोजी श्री.पदमाकर हुकुमचंद पाटील,श्री.पांडूरंग मोतीराम पाटील,श्री.प्रेमचंद पोपट पाटील हे संचालक हजर वरील संचालकांनी कर्ज भरणा करण्याची मुदतवाढ मागीतली पुढील तारीख २०/०३/२०१७ रोजी घेण्यात आली. सदर सुनवणी दिवशी संचालक अनुपस्थित होते.सबब नियत तारखेस सदर संचालक कर्ज भरण्यास असमर्थ असल्याने संस्थेचे उपविधी नुसार उपविधी क्र.६ मधील १६ (अ) नुसार संस्थेचे अपात्र समिती सदस्य पुढील प्रमाणे १)श्री.सुकलाल गंभिर पाटील चेअरमन २)श्री.डिगंबर चिंधू पाटील व्हा.चेअरमन ३)श्री.सुनिल दत्तात्रय जोशी संचालक ४) श्री.राजेंद्र भगिरथ पाटील संचालक ५)श्री.मच्छींद्र मुरलीधर पाटील संचालक ६)श्री.पांडूरंग मोतीराम पाटील संचालक ७) श्री.प्रमराम पोपट पाटील संचालक ८) श्री.पदमाकर हुकुमचंद पाटील, ९) श्री.भिका वामन ठाकुर १०) श्रीमती.इंदुबाई चिंतामण कोळी संचालिका ११) श्रीमती,हिराबाई चिंतामण पाटील संचालिका

ज्या अर्थी या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कअ (१)(एक) (अ)व कलम ७८अ(१) (ब) अन्वये दिलेली सुनावणी नोटीस ची प्रत म.मुख्य कार्यकारी अधिकारी,दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव यांना देवुन १५ दिवसांच्या आंत अभिप्राय सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते. तथापी आजतारखे पर्यंत त्यांनी अभिप्राय सादर केलेले नसल्याने प्रस्तुत प्रकरणी त्यांची मुकसंमती आहे असे गृहीत धरण्यात आलेले आहे.

ज्या अर्थी संस्थेच्या १२ संचालकापैकी वर नमुद ११ संचालक अपात्र झाल्याने संचालक मंडळ अल्पमतात आलेले आहे.

त्या अर्थी संस्थेचे कामकाज उपविधी मधील तरतदीनुसार सुरळीत रहाणेच्या दृष्टीने प्राधिकृत अधिकारी ( प्रशासकाची ) नियुक्ती करणे वरील परिस्थितीच्या अनुषंगाने क्रमप्राप्त झाल्याने मी खालील आदेश देत आहे

## -:आदेश :-

मी गुलाब पाटील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगांव जि.जळगांव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन वरील नमुद केलेल्या वस्तुथितीच्या आधारावर,परीस्थीतीमुळे व कारणास्तव सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. सोनवद खु ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेची व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत आहे. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालविण्यासाठी श्री.ए.एस.पवार उप लेखापरिक्षक सहकारी संस्था एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव यांची संस्थेचे प्रशासक म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्रशासक यांनी पदभार घेतल्यापासुन सहा महिन्याचे कालावधीत नविन समितीची रचना करणे बाबत कायदेशीर कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दि. १२/०५/२०१७ रोजी माझे स्वाक्षरीने व कार्यालयीन मोहर ठसवुन निर्गमित केला असे.

स्थळ:- धरणगांव

दिनांक:-१२/०५/२०१७

( गुलाब पाटील )

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था,धरणगांव

प्रति,

१) चेअरमन/सचिव , सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. सोनवद खु ता.धरणगांव जि.जळगांव

२) श्री.ए.एस.पवार उप लेखापरिक्षक सहकारी संस्था एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव तथा,प्रशासक, सोनवद खु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. सोनवद खु ता.धरणगांव

सदर संस्थेच्या प्रशासक पदाचा पदभार घेवुन तसा अहवाल सादर करावा.

प्रत:- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) शाखा व्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा. सोनवद बु ता.धरणगांव जि.जळगांव

२) मा. व्यवस्थापक येरवडा कारागृह मुद्रणालय पुणे ६

२/- आपणासं विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची प्रत शासनाच्या येत्या राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या चार प्रति या कार्यालयास पाठवाव्यात.

३) लेखा परिक्षक सहकारी संस्था एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव

४) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव माहितीसाठी सविनय सादर

५)म.कार्यकारी संचालक,दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था धरणगांव